# प्रकरण - पाचवे

# मूल्यमापन

# प्रकरण - पाचवे

## 'मूल्यमापन'

ब्रिटिशांनी राज्यकारभार करण्यासाठी हिंदूस्थानचे अनेक प्रांतात विभाजन केले. विभाजन झालेल्या प्रांतातील महत्त्वपूर्ण प्रांत म्हणजे सरहद्द प्रांत होय. १९४७ पूर्वी हिंदूस्थानच्या व १९४७ नंतर पाकिस्तानच्या दृष्टिने सर्वात महत्वाचा असा सरहद्दीवरील मुलूख म्हणजे पठाणांचा सरहद्द प्रांत होय. हा प्रांत दुर्गम, पहाडी, अगदी विरळ वस्तीने आणि लढाऊ, हत्यार बंद टोळीवाल्याचा विस्तीर्ण प्रदेश होय. इतिहासाने आणि भूगोलाने, स्वभावाने व परंपरेने येथील पठाणांना स्वतंत्र वृत्ती आणि लढाऊ बाणा दिलेला होता. पठाण हे धर्माने मुसलमान असले तरी ते हिंदूद्वेष्टे मुळीच नव्हते. कारण द्वेष करण्याइतपत हिंदूची संख्या त्यांच्या मुलखात जास्त नव्हती. आणि जे होते ते सावकार व जमीनदार होते. त्यामुळे पठाणी टोळ्यांना हिंदू दुश्मन म्हणून कोणी नव्हतेच. पठाणांच्यामध्ये मोठ्याप्रमाणात टोळी युध्द होत असत.

पठाणांच्यामध्ये शिक्षणांचा प्रसार नव्हता त्यामुळे पठाण टोळी-टोळीने आपसात भांडत व लढत असत. त्याच्यामध्ये हाडवैर असे. 'बदला' घेणे ही संकल्पना त्यांच्यात फार चालत असे कारण बदला घेण्यासाठीच आपला जन्म आहे असे पठाणांच्यात शिकवण दिली जात असे. दिल्लीशी त्यांचे शेंकडो वर्षाचे, कायमचेच, परंपरागत व इतिहासाने दिलेले वैर होते,-मग दिल्लीचा सुलतान असो, मोगली साम्राज्य असो किंवा नंतर इंग्रजांची राजवट असो! दिल्लीशी असलेले हे वैर प्रत्येक टोळीवाल्याच्या जन्मापासूनच रक्तात भिनलेले होते. या टोळीवाल्यांना आपला मुलूख, आपली टोळी, जमात, आपला जिर्गा, आपली पश्तु जबान, आणि आपला सरदार हेच फक्त माहित

होते, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सर्व पठाणांना माहित होती, ती म्हणजे आपली ठासलेली बंदूक!

अशा या दूरदूर टोळ्यांनी वसलेल्या खेड्यात पसरलेल्या पठाणी जमातीमध्ये जन्माला आलेले उतमंझाईचा नेता म्हणून पुढे आलेले गफारखान होय. गफारखान यांनी सरहद्द प्रांतात शाळांची स्थापना करून मोठ्या प्रमाणात सामाजिक, राजकीय जागृती निर्माण केली होती. गफारखान यांच्या पंजोबापासून नेतृत्वाची धुरा त्यांच्या घराण्यात होती. नंतर वडीलांनी (बहिरामखान) ही परंपरा चालवली. नंतर गफारखान यांनी ही घराण्याची परंपरा चालवण्याचे कार्य केले परंतू अहिंसेच्या मार्गानी. हा मोठा फरक त्याच्यात व त्याच्या घराण्यात आपल्याला दिसून येतो. म. गांधीजीनी इंग्रजी हुकुमतीला हादरे दिले म्हणून पठाणांनी व गफारखान यांनी मनापासून म.गांधीजीना आपला पुढारी मानले. एकदा नेता मानल्यानंतर गांधीजीना आणि गांधीजी म्हणतात म्हणून सत्य-अहिंसेला त्यांनी आपले सर्व आयुष्य वाहिले. इंग्रजाविरूध्द प्रतिकाराची वेगळी शिकवण देण्यांची गफारखान व पठाणांना गरजच नव्हती. कारण गफारखान यांनी गांधीजीच्या उदयापूर्वीच सरहद्द प्रातांत अहिंसेच्या मार्गाने इंग्रजांचा प्रतिकार करण्यास सुरूवात केली होती.

**पठाणांची सुरूवातीपासूनच इंग्रजांबरोबर दुष्मनी :**

पठाणांची आणि इंग्रजांची दुष्मनी ही इंग्रज हिंदूस्थानात आल्यापासून सुरू होती ती इंग्रज हिंदूस्थानातून जाईपर्यंत होती.अहिंसेच्या जादूगीरीने दोन्ही गांधी भारलेले होते यात तीळमात्र शंका नाही. आणि म्हणूनच १९२० ते १९३० च्या लढ्यामध्ये या पठाणांनी अभूतपूर्व अशा निष्ठेने, शौर्याने, शिस्तीने भाग घेतला आणि ही संघटना

प्रत्येक खेड्यात सरहद्द प्रांतात निर्माण झाली. लाल डगले या संघटनेचे प्रतिक ठरले सरहद्द गांधी यांच्या नावाने या पठाण मुलखाला ओळखले जाऊ लागले. म. गांधीजींनी आणि साऱ्या देशाने खुदाई-खिदमतगार आणि गफारखांनाचे कौतुक केले परंतु इंग्रजांनी मात्र या संघटनेचा आणि त्यांच्या नेत्यांचा सतत मोठ्याप्रमाणात द्वेषच केलेला दिसून येतो. ब्रिटिशांच्या लष्करात, पलटणीत शेकडो पठाण असतानाही गफारखानांच्या प्रभावापुढे ब्रिटिश सरहद्द प्रांतात अपयशी ठरले होते यात तीळ मात्र शंका नाही. सरहद्द प्रांतात ब्रिटिशांनी मोठ्याप्रमाणात भाडोत्री मौल्लामोलवीकडून या संघटनेला त्रास दिला होता. येथील सरदारांना नियमितपणे खंडण्या देऊन ब्रिटिशांनी संघटनेला व गफारखान यांना त्रास दिला होता परंतू गफारखान यांच्या प्रभावापुढे ब्रिटिश सुरूवातीपासूनच निष्फळ ठरले होते. या सर्व बाबीमुळे ब्रिटिशांचा संघटने बद्दलचा व गफारखान यांच्या बद्दलचा द्वेष वाढतच चालला होता. त्यामुळे म.गांधीजी परवडले परंतू गफारखान नको या बद्दल सर्व ब्रिटिश अधिकाऱ्याचे एकमत बनले होते.

**गफारखान यांचा प्रभाव व डॉ. खानसाहेब मंत्रिमंडळाचा कारभार :**

सरहद्द प्रांतात १९३७ च्या निवडणुकीनंतर काँग्रेसचे व खुदाई खिदमतगारांचे मंत्रिमंडळ सत्तेवर आले आणि गफारखान यांचे बंधू डॉ.खानसाहेब मुख्यमंत्री झाले. या मंत्रिमंडळावर गफारखान यांचा प्रभाव मोठ्याप्रमाणात होता. दुसऱ्या महायुध्दाला सुरूवात झाली आणि काँग्रेसच्या आदेशानुसार मंत्रिमंडळाने राजीनामे दिले. बॅ. जीना साहेबांनी काँग्रेस मंत्रिमंडळाच्या राजीनाम्यानंतर देशभर मुक्तिदिन पाळला. सर्वत्र दंगली निर्माण झाल्या शेकडो मरण पावले बंगाल,बिहारमध्ये अत्यंत वाईट परिस्थिती निर्माण झाली त्यामुळे हिंदू-मुस्लिम यांच्यामध्ये फुट मोठ्याप्रमाणात पडली. पण सरहद्द प्रांतात

जीनांचा आदेश मानणारे कुणीच नव्हते असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण बॅ. जीनाचे त्यावेळी नाव सुध्दा जास्त करून नव्हते. लवकरच बॅ. जीनांनी पाकिस्तानची घोषणा दिली. पण तिचा प्रतिध्वनीही पठाण मुलखात काही वर्षे पोहचला नाही. तेव्हापासून बॅ. जीना व त्याची मुस्लिम लीग यांच्या डोळ्यामध्ये पठाण व गफारखान आणि डॉ. खानसाहेब यांचे मंत्रिमंडळ सुईसारखे सलू लागले. बॅ. जीना व ब्रिटिश यांच्यामध्ये पठाणांच्या विरूध्द एकमत असले पाहिजे. लढाईच्या काळात खुदाई-खिदमतगार संघटना बेकायदेशीर ठरवण्यात आली. त्यावेळी गफारखान तुरुंगात होते. याच काळात महायुध्दाच्या निमित्ताने पठाणांची ब्रिटिश सैन्यामध्ये मोठ्या प्रमाणात भरती झाली. आणि या सैनिकांचा वापर ब्रिटिशांनी फक्त लढाईसाठीच केला असे नाहीतर खुदाई-खिदमतगार संघटनेला खेड्यापासून शह देण्यासाठी प्रयत्नपूर्वक केला. गफारखान यांच्याबद्दल पठाणांमध्ये कितीही आदर असला आणि खुदाई-खिदमतगार संघटना ही कितीही बळकट असली तरी डॉ. खानसाहेबाच्या काँग्रेस मंत्रिमंडळाच्या दोन वर्षाच्या कारभारामुळे त्यांच्या प्रतिष्ठेत भर टाकली नसावी असे मानण्यास जागा आहे. किंबहुना सर्वसामान्य जनतेत गफारखान व त्याचे बंधू डॉ. खानसाहेब यांच्याबद्दल काही एक तफावत पडू लागली होती. म्हणजे असे की गफारखान हे सर्व पठाणांच्या आदराचे आणि निष्ठचे स्थान होते. पण त्यांच्या नावाने राज्य चालवणारे डॉ. खानसाहेब यांच्या बद्दल मात्र पठाणांच्या भावना काही वेगळ्याच असाव्यात असे दिसते. कारण पुढे पठाणांच्यामध्ये परिवर्तनास सुरूवात झालेली दिसते.

## १९४६ पासून पठाणांमधील परिवर्तनास प्रारंभ :

१९४६ ला हिंदूस्थानमध्ये निवडणूका झाल्या त्याच बरोबर सरहद्द प्रांतात ही निवडणूका झाल्या. आणि डॉ. खानसाहेब पुन्हा मुख्यमंत्री झाले. डॉ.खानसाहेब यांच्या

१९४६ च्या मंत्रिमंडळा बद्दल पठाणी जनतेच्या मनात फारसा उत्साह नव्हता.किंबहुना त्यांच्याबद्दल पठाणामध्ये एक प्रकारचा दुरावाच निर्माण होवू लागल्याची चिन्हे दिसू लागली होती. पुढील काही काळात या मंत्रिमंडळाचा कारभार चालला त्यामुळे डॉ.खानसाहेबांच्या लोकप्रियतेत प्रतिष्ठेत कमीपणा जाणवण्यास सुरूवात झाली.पठाणांमध्ये असंतोषाची चिन्हे दिसू लागली. इंग्रज व मुस्लिम लीग सरहद्द प्रांतात मोठ्याप्रमाणात संघटनेबद्दल व त्यांच्या नेत्याबद्दल असंतोष पसरवण्यास यशस्वी झाले होते. बॅ. जीनांची वाढती लोकप्रियता वाढत चाललेली पहावयास मिळते. सरहद्द प्रांतात 'पाकिस्तान झिंदाबाद' च्या घोषणा तेथील पठाण स्त्री-पुरूषाच्या तोंडामधून बाहेर पडताना दिसतात.

पठांणामध्ये हा जो काही बदल घडून येत होता तो फार शिगेला पोहचल्यासारखा वाटत आहे कारण पंडित नेहरू ज्यावेळी सरहद्द प्रांताच्या दौऱ्यावर आले तेव्हा त्यांना मोठ्याप्रमाणात विरोध झाला. पठाणांनी निदर्शने केली. सरहद्द प्रातांतील कॉंग्रेस मंत्रिमंडळाला आणि डॉ. खान साहेबांच्या प्रतिष्ठेला गंभीर धक्का निर्माण झाला. एवढी गोष्ट तरी त्या प्रसंगामुळे नक्कीच सिध्द झाली. आणि त्यानंतर जातीय दंगलीपासून सरहद्द प्रांत फार दिवस मुक्त राहू शकला नाही.

**बॅ. जीनांची वाढती लोकप्रियता :**

१९४६ नंतर सरहद्द प्रांतात मुस्लीम लीग व बॅ.जीना यांची लोकप्रियता वाढण्यास सुरूवात झालेली दिसून येते. बॅ.जीना पेशावरमध्ये आले तेव्हा त्यांचे जंगी स्वागत करण्यास पठाणांचा मोठा पुढाकार होता. थोडक्यात म्हणजे सरहद्द प्रांताला पाकिस्तानची लागण होऊ लागली होती यात शंका नाही. त्यामुळे बॅ. जीनासाहेबांच्या सरहद्द प्रांतातील चढाईचा जोर आणि वेग वाढतच गेला. फारसे हिंदू नसतानाही

मुसलमानांची धर्मांधता वाढीसच लागली. आणि त्यांच्या द्वेषाचा रोख डॉ. खानसाहेबांचे मंत्रिमंडळ आणि गफारखान व त्यांची संघटना यांच्यावर असलेला दिसून येतो. ब्रिटिश हस्तकांनी, लष्करी अधिकाऱ्यांनी,लाल डगलेवाल्यावर ठिकठिकाणी हल्ले सुरू केले. बॅ.जीनांच्या आणि इंग्रजांच्या या चौफेर चढाईला प्रभावीपणे तोंड देऊन प्रतिचढाई करण्याची हिंमत आणि कुवत तेव्हा तरी पुढील निर्णायक वर्षात कुणी दाखविली नाही ही वस्तूस्थिती आहे. मुस्लिम लीग मुसलमानांचे प्रतिनिधीत्व करते आणि ही संघटना हिंदू द्वेष्टी आहे हे दिसून येते, इंग्रजांच्या 'फोडा आणि झोडा' ला या संघटनेने अप्रत्यक्षरितीने मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिलेला आपणाला दिसून येतो.

**गफारखान जेव्हा खचले :**

गफारखानांची प्रतिष्ठा आणि लोकप्रियता कायम होती असे म्हणता येईल. ती तशी असेलही, आणि बहुधा होती सुध्दा. पण सरहद्द प्रांतात गफारखान व म. गांधीचा तीव्र व्देष पठाणांमध्ये निर्माण करण्यांत जीनासाहेब व इंग्रज यशस्वी झाले होते या बद्दल मात्र शंका नाही. शिवाय देशांच्या फाळणीला नेहरू-पटेलानी मान्यता द्यावी आणि म.गांधीजींही त्यांच्यापुढे हतबल ठरावेत या वेगाने घडलेल्या घटनांनी सत्तांतराच्या अखेरच्या पर्वामध्ये गफारखान खचून गेले होते यात शंका नाही. 'तुम्ही आम्हा अहिंसक व इमानी पठाणांना लांडग्याच्या तोंडी देत आहात' हे गफारखानाचे हताश आर्त उदगार अंत:करणाला कितीही पीळ पाडीत असले तरी रोकड्या, निष्ठूर राजकारणात ते निरूपयोगीच ठरणार होते. त्याच्या बोलण्यामध्ये स्वत:चा व म. गांधीचाही पराभव व्यक्त होत होता. त्या क्षणी तरी पठाण मुलखात गफारखानांचे परंपरागत नेतृत्व, साधुत्व, महात्म्य पराभूत झाले होते. आणि ज्यांचे नाव ही कधी

पठाण मुलाखत ऐकले नव्हते. अशा महंमदअली जीना नावाच्या पुढाऱ्याचा जयघोष पठाण मुलखात रात्रंदिन सुरू झालेला दिसून येतो.

हिंदूस्थानच्या फाळणीची माऊंटबॅटन योजना काँग्रेस आणि मुस्लिम लीग या उभय पक्षांनी मान्य केल्यानंतरही सरहद्द प्रांतातील पठाणांना इतर कुणालाही नव्हती अशी,एक संधी देण्यात आली होती. ती म्हणजे पठाणांच्या भवितव्याचा प्रश्न स्वत:हा पठाणांना वरच-म्हणजे त्यांच्या खुल्या सार्वमतावर सोपवला होता. १९३७ व १९४६ या दोन सार्वत्रिक निवडणुका खान बंधूनी मोठ्या जिद्दीने जिंकल्या होत्या. पठाण मुलखाचे भवितव्य ठरविण्यासाठी होणाऱ्या सर्वमताला गफारखान यांनी विरोध केला होता.व बहिष्कार टाकला होता. याचा अर्थ असा होऊ शकतो की सार्वमताचे आव्हान ते आता स्वीकारू शकत नव्हते. सार्वमताचा कौल घेण्याची हिंमतसुध्दा त्यांच्यात राहिली नव्हती हा काय चमत्कार आहे? व्यवहारी, राजकारणी ,सत्तालोभी डॉ. खानसाहेबांचे एक वेळा सोडा पण निस्वार्थ, निर्भय, साधुतुल्य गफारखानही इतके खचून जावेत याचा अर्थ काय? नाहीतर एरव्ही सार्वमतावर बहिष्कार घालण्याच्या त्यांच्या निर्णयाचा दुसरा अर्थ काय समजायचा? ते काहीही असो, सार्वमताच्या क्षणी तात्पुरते का होईना, पठाण मुलूखाचे भवितव्य ठरविण्याच्या क्षणी गफारखांनाचा पराभव झाला. आणि तो पराभव जीनांनी आणि पाकिस्तानने केला, ही तर प्रत्यक्षात घडलेली घटनाच आहे. आणि ऐतिहासिक वस्तूस्थिती म्हणून ती मान्य करायलाच पाहिजे.

गफारखानांचा हा पराभव खरोखर एकट्या जीनांनीच केला काय? त्यात इंग्रजांचा, लष्करी अधिकाऱ्यांचा वाटा किती होता? आणि खोलवर जाऊन विचारायचेच

झाले तर डॉ. खानसाहेबांच्या दोन मंत्रिमंडळांच्या कारभाराचासुध्दा वाटा किती होता? हे प्रश्न आजही विचारण्यासारखे आहेत. पण गफारखान यांच्या पराभवाचे उत्तर याहूनही वेगळे आहे. त्या क्षणी गफारखानांचा पराभव जीनांनी व इंग्रजांनी केला नाही तर गफारखानांचा खरा पराभव हिंदूस्थानची फाळणी स्विकारणाऱ्या काँग्रेसने केला. तसेच हिंदूस्थानची फाळणी मान्य करणाऱ्या पटेल-नेहरूनी 'केला. पठांणामध्ये 'पाकिस्तान की हिंदूस्थान ' या बद्दलच सार्वमत होणार होते. हिंदूस्थानात सामील व्हा असे सांगण्याची हिंमत आता गफारखान व डॉ. खानसाहेब यांच्यामध्ये नव्हती आणि पाकिस्तानमध्ये सामील होण्याची त्यांची इच्छा नव्हती. आणि स्वतंत्र्य पख्तुनिस्तानचा पर्याय सार्वमतासाठी त्यांच्या समोर ठेवलेलाच नव्हता हे उघड आहे.

## गफारखानच पठाणांचे राष्ट्रपिता :

गफारखान यांचा पराभव क्षणिक प्रासंगिक झालेला होता अशीच आज ६० वर्षानंतर इतिहासाची साक्ष ठरेल. जीना साहेब वर्षातच गेले. त्यांची मुस्लिम लीग ही लवकरच इतिहास जमा झाली. पाकचे राज्यकर्ते वर्षानुवर्षाला बदलत गेले. कुणाचे खुन झाले, कुणी पदच्युत झाले. डॉ. खान साहेब यांचाही खुन झाला आणि हे बहुतेक राज्यकर्ते परकियांचे, साम्राज्यवाद्याचे हस्तक म्हणून कार्यकरीत राहीले परंतु गफारखान यांचे नाव व कार्य आजही सर्व जगभर इतिहासात नोंद झालेले आहे. आयुष्यभर त्यांनी अहिंसेला वाहून घेतले आणि पठाण समाजाची सेवा केली. हिंदूस्थान स्वातंत्र्य होण्यापूर्वी त्यांना १५ ते १६ वर्ष तुरूंगात राहवे लागले. आणि पाकिस्तान स्वातंत्र्यानंतर ही त्यांना पाकिस्तानमध्ये १५ वर्ष तुरूंगात राहवे लागले. अनेक प्रकारचा छळ सहन करावा लागला. परंतू ज्यांनी हिंदूस्थानच्या स्वातंत्र्यासाठी आपले सर्व आयुष्य वाहिले

अशा नेत्याला व त्यांच्या पख्तुनिस्तानच्या मदतीला कोणीही हातभार लावला नाही. अफगाणिस्तान व भारत हे दोन देश पठाणांना मदत करतील अशी अपेक्षा त्यांची त्यांच्या मृत्युपर्यंत होती. तसेच गांधीजींची हत्या ही कितीही निर्घृण निषेधार्ह असली तरी त्या घटनेबद्दल उलटसुलट चर्चा तरी गेली ६०वर्षे सतत होत राहिलेली आहे. पण या फाळणीच्या संदर्भात माऊंटबॅटन यांनी जो गुन्हा केला त्यांची पुरेशी ठसठशीत अशी नोंदसुध्दा जनमनावर झालेली दिसत नाही. त्या गुन्हाला माऊंटबॅटन हेच व्यक्तिश: जबाबदार आहेत या बद्दल शंका नाही. आणि हा गुन्हा म्हणजे अक्षम्य घिसाडघाई करून फाळणीचा आणि सत्तांतराचा मुहूर्त ठरविणे हा होय.

सत्याग्रही प्रतिकार साधनांचा जागरूकतेने व जाज्वल्य निष्ठेने उपयोग करणारे गफारखान हे एक सर्वश्रेष्ठ असे नेते आहेत. गांधीयुगातील भारतीय नेत्यामध्येही सत्याग्रही आंदोलनाचे झुंझार संघटक या नात्याने त्यांचे स्थान फार मोठे आहे. असे असले तरी त्यांचे चरित्र भारताला पूर्ण परिचित झालेले नाही. फाळणीनंतरच्या अंधारात त्यांच्या सर्व कार्यावर लोखंडी पडदा पडला आहे. पाकिस्तानमध्ये दिलेल्या लढ्यात त्यांची अत्युत्कट तत्वनिष्ठा, विलक्षण निर्भयता व जनताप्रेम यांची सर्व प्रकारची कसोटी झाली. प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी सत्याग्रहाचे शस्त्र वापरात आणले, ते गंजू दिले नाही. स्वातंत्र्योत्तर काळातील स्वकीय (पाकिस्तान) शासकांविरूद्ध या साधनाचा निर्धारपूर्वक उपयोग करण्यात त्यांनी या शास्त्राचा व शस्त्राचा विस्तार केलेला आहे. भारतात पूज्य विनोबाजींनी या शास्त्राचा वेगळ्या क्षेत्रात व वेगळ्या पद्धतीने विस्तार केलेला आहे. गफारखानांच्या ६० वर्षाच्या अखंड लढ्याने जगापुढे व विशेषत: गांधीजींचा वारसा सांगणाऱ्या भारतापुढे नव्या समस्या व नवी आव्हाने सादर झालेली आहेत. सर्व प्रकारच्या सामाजिक अन्यायांचा वेळेवर प्रतिकार करून पीडित

समाजातील लोकांना न्याय मिळवून देण्यास अहिंसा, सत्य ही साधने समर्थ आहे, हा भरवसा व अनुभव लोकांना देणे भारतातही निकडीचे झालेले आहे. गफारखानांनी या दृष्टिने सत्याग्रही परंपरेची व एक अर्थाने गांधीजींचीही थोर सेवा केलेली आहे. सत्याग्रही शास्त्राला व शस्त्राला सोनेरी छापाच्या प्रकाशन-वेष्टनात किंवा परिसंवादाच्या पिंजऱ्यात गुंडाळून ठेविले नाही, हा त्यांचा आदर्श भारताला. वेगवेगळ्या क्षेत्रात मार्गदर्शक होणार आहे. त्यांचे ऋण आज द्विगुणित झालेले आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या ६० वर्षात आम्ही अल्पसंख्यांकांचे प्रश्न नीट सोडवू शकलेलो नाही. आणि आज तो चिंतेचा विषयच आहे. केवळ अल्पसंख्यांक किंवा बहुसंख्याकांच्या भावनेपुरता अगर हितापुरता तो विषय मर्यादित नाही. आशियातील व जगातील लोकशाहीचे भवितव्य त्यावर अवलंबून आहे. या दृष्टिने तो निवर्डीने व व्यवस्थित रितीने हाताळला जाणे जरूरीचे आहे.

गफारखान यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी व हिंदूस्थानच्या स्वातंत्र्यासाठी आयुष्यभर ज्यांनी अहिंसात्मक लढा दिला. हिंदू-मुस्लीम ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अशा ह्या नेत्यांचा १९८७ साली ‘भारत रत्न ’ देऊन भारत सरकारने गौरव केला. गफारखानचे एकूणच कार्य पाहिले तर अंतकरण हेलावून जाईल एवढे कार्य पठाण प्रांतात केलेले आपणाला दिसून येते. गफारखान यांनी केलेली ‘जिहाद’ ची संकल्पना आणि त्यांच्या मृत्युनंतर आधुनिक जगात निर्माण झालेली ‘जिहाद’ची संकल्पना याच्यामध्ये फार मोठ्या प्रमाणात तफावत असलेली दिसून येते. भारत आणि अफगाणिस्तान यांनी पठाणांना त्यांचा पख्तुनिस्तान स्वतंत्र्य करू देणं हिच गफारखान यांच्या ‘आत्म्याला शांती ’असे वाटते.

## संदर्भ सूची


१) जोशी ह. मो. – ‘बादशाहखान’ – नीलकंठ प्रकाशन, पुणे, १९६८.

२) थत्ते यदूनाथ – ‘सरहद्द गांधी : खान अबदुल गफार खान’ – साधना प्रकाशन, पुणे – १९६९.

३) गडकरी माधव – ‘शेवटचे गांधी’ – कोहिनूर प्रकाशन, मुंबई - १९७९.